Listening Passages

# ओमची सावली

एक वर्षाचा ओम नुकताच चालायला लागला होता. आईचे लक्ष नसताना तो घरा बाहेर अंगणात पळाला. अंगणात ऊन पडले होते. ओमने मागे वळून पाहिले तर काय ? एक काळा प्राणी अगदी त्याला चिकटून त्याच्या मागे मागे येत होता. त्याला मारायला ओमने हात वर केला तर तो प्राणी पण हात वर करायचा. ओम वाकला की तो देखील वाकायचा. ओम पुढे धावला की तो प्राणी पण धावायचा. ते बघून ओम घाबरला व जोरात रडायला लागला. आईने ते ऐकले , तिने ओमला उचलून घेतले. आता ओमला दोन काळे  प्राणी दिसत होते. त्यांच्याकडे बोट दाखवून तो आणखी रडायला लागला. आईला कळले की ओम स्वत:च्या सावली कडे पाहून रडत आहे. ती हसली व तिने त्याला घरात नेले.

प्रश्न:

१) ओमने अंगणात काय पाहिले?

२) तो काळा प्राणी कुठे चालला होता?

३) ओमने हात का वर केला?

४) ओमला दोन प्राणी का दिसले ?

५) तुला कोणत्या गोष्टीची भीती वाटते ?

## <u>एका चपलेची गोष्ट</u> (a story of a flip-flop sandal)

एकदा गांधीजी आगगाडीने जाणार होते. गाडीची वेळ झाली होती म्हणून ते घाईघाईने चालत होते. चालता चालता त्यांची चप्पल पायातून निघाली व मागे पडली. ते तसेच गाडीच्या डब्यात चढले. एका मुलाने ती उचलली व तो त्यांना देण्यासाठी धावला.

गांधीजींनी पाहिले की त्या मुलाच्या पायात चपला नाही. तरी देखील तो त्यांना ती चप्पल देत होता. गांधीजींनी स्वतःच्या पायातली दुसरी चप्पल काढली व त्या मुलाकडे फेकली. त्याला ओरडून सांगितले की तू दोन्ही चपला घाल. त्याला फार आनंद झाला. तो मुलगा हसला व त्याने नमस्कार केला.

प्रश्न:

१) गांधीजी कुठे चालले होते?
२) चालताना काय झाले?
३) मुलाने पहिली चप्पल घेऊन काय केले?
४) गांधीजीनी मग काय केले?
५) तू कधी कोणाला कशी मदत केली? का?

Reading Passage

# ससा

निखिलने एक ससा पाळला आहे. तो तपकिरी  रंगाचा आहे. त्याचे अंग कापसासारखे मऊ मऊ आहे. त्याचे लाल डोळे चमकतात. जरासा आवाज झाला की  तो दचकतो. पण मला तो घाबरत नाही. मी त्याला झाडाची पाने, गाजर व काकडी खायला देतो. मी चिंगु चिंगु इकडे ये असे म्हटले की तो धावत येतो.

प्रश्न:

१) निखिलने काय पाळले आहे?

२) ससा कसा दिसतो?

३) ससा कशामुळे घाबरतो?

४) ससा काय काय खातो?

५) सशाला हाक मारली की तो काय करतो ?

Reading Passage

# मीठ की साखर

अजयची आई बाजारात गेली होती. बाबांनी चहा करायचे ठरविले. पाणी गरम केले, चहा पावडर घातली. दूध घातले. साखरेचा डबा उघडला तर तो रिकामा होता. बाबांनी अजयला विचारले की आणखी साखर कुठे आहे ते पाहा. अजयने कपाटात शोधले व दुसरा डबा आणला. बाबांनी चहा प्यायला व थू थू करून टाकून दिला. कारण तो दुसरा डबा मिठाचा होता. ते दोघेही जोर जोरात हसू लागले.

प्रश्न:

१) बाबा का चहा करत होते ?

२) चहा करायला काय लागते ?

३) अजयने दुसरा डबा कुठून आणला?

४) चहा का टाकून दिला?

५) साखर, मीठ यांची चव कशी लागते?